॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

*** सुविचार ***

इच्छा दांडगी असली की मदत आपणहून तुमच्याकडे चालत येते.




अहिल्यानगर ▪ शुक्रवार, दि. २५ एप्रिल २०२५ ▪ वर्ष ६ वे ▪ अंक १५ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ▪ 9420802145

## SPOT NEWS

### १०० पर्यटकांना घेऊन विशेष विमान मुंबईत येणार

● **मुंबई** – काश्मीर खोऱ्यातील पहलगाममध्ये मंगळवारी दुपारी झालेल्या दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश हादरला आहे. या हल्ल्यात दहशतवाद्यांनी पर्यटकांना लक्ष्य करत गोळ्या घातल्या. यामध्ये एकूण २८ जणांचा मृत्यू झाला. राज्यातील अनेक पर्यटक सध्या काश्मीरला फिरायला गेले असून या हल्ल्यानंतर शेकडो लोक तिथे अडकले आहेत. काश्मिरात अडकलेल्या महाराष्ट्राच्या नागरिकांना परत आणण्यासाठी आणखी एका विशेष विमानाची व्यवस्था करण्यात आली आहे. एअर इंडियाचे हे विमान महाराष्ट्रातील १०० पर्यटकांना घेऊन आज मुंबईत येईल. या विमानातील प्रवाशांची यादी सोबत जोडली आहे. दरम्यान, काश्मीरमधील महाराष्ट्राच्या नागरिकांना परत आणण्यासाठी आणखी एका विशेष विमानाची व्यवस्था झाली आहे. एअर इंडियाचे हे विमान महाराष्ट्रातील १०० पर्यटकांना घेऊन आज मुंबईला येईल. त्या १०० पर्यटकांच्या नावांची यादी जाहीर करण्यात आली आहे. मुख्यमंत्री कार्यालयाकडून ट्विट करत ही माहिती देण्यात आली आहे.

### छत्रपतींचा पुतळा ताशी २०० किलोमीटर वाऱ्याचा वेग झेलणार

● **मुंबई** – मालवण येथील राजकोट किल्ल्यावर बसविण्यात आलेला शिवाजी महाराजांचा पुतळा वाऱ्याच्या वेगाने पडला होता. त्यामुळे आता मालवण येथील समुद्रकिनाऱ्यावर वाऱ्याचा असणारा प्रचंड वेग लक्षात घेऊन नवीन पुतळ्याला वादळी वाऱ्याची झळ बसू नये म्हणून ऑस्ट्रेलियातील विंटेज कंपनीकडून ताशी दोनशे किलोमीटर वेगाने येणाऱ्या वाऱ्यावर पुतळ्याची चाचणी करून घेण्यात आली. त्यानंतर विंटेज कंपनीचे ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच हा पुतळा बसविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे, अशी माहिती बांधकामचे कार्यकारी अभियंता महेंद्र केणी यांनी दिली. नवीन पुतळ्याचे काम प्रसिद्ध चित्रकार राम सुतार यांच्या कंपनीला देण्यात आले असून, त्यांनी ही विशेष खबरदारी घेतली आहे. पुतळा बसविण्याचे काम सुरू करण्यापूर्वी सुतार यांनी येथील भौगोलिक परिस्थिती जाणून घेतली. मालवण किनारपट्टीवर प्रचंड वाऱ्याचा वेग असल्याने त्यांनी प्रथम छत्रपतींचा तीन ते चार फुटी पुतळा तयार करून घेत तो ऑस्ट्रेलियाला पाठविला होता.

# अटारी-वाघा बॉर्डरवर बदलली रिट्रीट सेरेमनी

## पहलगाम हल्ल्यानंतर ना हात मिळवले, ना गेट उघडले । पाकिस्तानविरोधात भारताची कठोर भूमिका

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**

जम्मू काश्मीरमधील पहलगाम हल्ल्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली आहे. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी २६ निष्पाप पर्यटकांची गोळ्या झाडून निर्घृणपणे हत्या केली आणि पळ काढला. या हल्ल्यानंतर सुरक्षा दलांनी शोध मोहीम हाती घेतली आहे. सरकारनेही पाकिस्तानविरोधात कडक पावले उचलली आहेत. सिंधू करार स्थगित करण्यासोबत भारताने पाच मोठे निर्णय घेतले. दुसरीकडे या दहशतवादी हल्ल्याचा परिणाम अटारी वाघा सीमेवरही पाहायला मिळाला. भारत सरकारने अटारी बॉर्डरजवळील चेकपोस्ट बंद केली आहे. त्यानंतर अटारी बॉर्डरवर दररोज होणाऱ्या रिट्रीट सेरेमनीमध्ये बदल पाहायला मिळाला.



पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, पंजाबमधील अटारी, हुसैनीवाला आणि सदकी येथे रिट्रीट समारंभात बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला. सीमा सुरक्षा दलाच्या पंजाब फ्रंटियरने दिलेल्या माहितीनुसार अटारी–वाघा सीमेवर रिट्रीट सेरेमनी दरम्यान भारतीय गार्ड कमांडर आणि पाकिस्तानी गार्ड कमांडर यांच्यात प्रतीकात्मक हस्तांदोलनाची परंपरा बंद केली जाईल. याशिवाय, कार्यक्रमादरम्यान दरवाजे देखील बंद राहतील. पहलगाममधील अलिकडच्याच दु:खद हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, पंजाबमधील अटारी, हुसैनीवाला आणि सदकी येथे रिट्रीट सेरेमनीच्या वेळी होणाऱ्या समारंभ मर्यादित स्वरुपाचा करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असे पंजाब फ्रंटियरने सांगितले.

त्यानुसार संध्याकाळी अटारी–वाघा सीमेवर दररोज होणाऱ्या रिट्रीट सेरेमनीमध्ये बदल दिसून आला. नेहमी बीएसएफ आणि पाक रेंजर्सच्या जवानांमध्ये औपचारिक हस्तांदोलन होते. परंतु यावेळी ना दरवाजे उघडले गेले आणि ना हस्तांदोलन झाले. अटारी सीमेवर झालेल्या रिट्रीट सेरेमनीमध्ये दोन्ही देशांचे दरवाजे उघडले गेले नाहीत. दोन्ही देशांचे झेंडे बंद दरवाज्यांमध्ये खाली उतरवण्यात आले. बीएसएफ जवानांनी पाक रेंजर्सशी हात मिळवले नाहीत. तसेच आजच्या समारंभात लोकांची संख्याही कमी होती. यााधी दररोज सुमारे २० हजार लोक उपस्थित असत. मात्र आज केवळ १० हजार लोक उपस्थित होते.

दरम्यान, २६ लोकांच्या मृत्यूनंतर भारत सरकारने पाकिस्तानविरुद्ध कडक पावले उचलली आहेत. यामध्ये पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांच्या आत देश सोडण्यास सांगितले. त्यानुसार आज १०५ भारतीय पाकिस्तानातून भारतात परतले. तर २८ पाकिस्तानी नागरिक पाकिस्तानात परतले आहेत. पाकिस्तानी नागरिकांना दिले जाणारे वैद्यकीय व्हिसा फक्त २९ एप्रिल पर्यंत वैध असतील. देशात असलेल्या सर्व पाकिस्तानी नागरिकांना व्हिसा कालावधी संपण्यापूर्वी भारत सोडावा लागणार आहे.

# छत्तीसगडमध्ये चकमक, ७ नक्षलवाद्यांचा खात्मा

## पोलिस, कोब्रा, राखीव दलाची संयुक्त कारवाई

● **बिजापूर । वीरभूमी–**

छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यातील करेगुट्टा जंगल परिसरात सुरक्षा जवान आणि नक्षल्यांत जोरदार चकमक सुरू असून, आतापर्यंत झालेल्या चकमकीत ७ नक्षल्यांचा खात्मा करण्यात आला. घटनास्थळी सुमारे १ हजार नक्षलवादी उपस्थित असल्याची माहिती समोर आली आहे. या नक्षल्यांना आता १० हजार सुरक्षा जवानांनी घेरले आहे. त्यामुळे ही सर्वांत मोठी कारवाई मानली जात आहे.

जिल्हा राखीव रक्षक दल, बस्तर फायटर्स, विशेष टास्क फोर्स, राज्य पोलीस दल, केंद्रीय राखीव पोलीस दल आणि कोब्रा बटालियन यांच्या संयुक्त पथकाने ही कारवाई सुरू केली असून, गुप्तचर माहितीच्या आधारे ही मोहीम आखण्यात आली. बिजापूर जिल्ह्यातील उसूर पोलिस ठाणे क्षेत्रातील गलगम–नडपल्ली परिसरातील डोंगराळ भागात ही चकमक सुरू आहे. परिसरात सतत गोळीबाराचा आवाज ऐकू येत आहे. याच दरम्यान, एक आयईडी स्फोट झाला असल्याची माहितीही समोर आली.

मोस्ट वॉन्टेड नक्षल कमांडर हिडमा आणि बटालियन प्रमुख देवा याच्यासह इतर महत्त्वाच्या नक्षल नेत्यांची हालचाल या भागात असल्याची माहिती सुरक्षा यंत्रणांना मिळाली होती. त्यानंतर व्यापक पातळीवर ही कारवाई सुरु करण्यात आली. कालपासून सुरू असलेली ही चकमक नडपल्लीच्या पहाडी परिसरात जोरात सुरू असून, सतत गोळीबाराचा आवाज कानावर येत आहे. ड्रोनच्या माध्यमातून चकमकीवर सुरक्षा दल सतत लक्ष ठेवून आहे.

या कारवाईत ३ राज्यांतील २० हजारांहून अधिक सुरक्षा दलाचे जवान सहभागी असून, सुमारे १ हजार नक्षलवाद्यांना घेरण्यात आले आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# पहलगाम हल्ल्यातील जखमींवर 'रिलायन्स'तर्फे मोफत उपचार : मुकेश अंबानी

● **मुंबई । वीरभूमी–**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश हादरला आहे. सामान्य माणूस असो किंवा विशेष व्यक्ती, निष्पाप आणि निशस्त्र पर्यटकांवरील भ्याड हल्ल्यानंतर सर्वांनाच दु:ख आणि धक्का बसला आहे. देशच नाही तर विदेशातूनही लोक या हल्ल्याचा तीव्र निषेध करत आहेत. घटनेनंतर भारत सरकारनेही पाकिस्तानबाबत अनेक कठोर निर्णय घेतले आहेत. आता देशातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आणि रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांनीही पहलगाम हल्ल्याबद्दल दु:ख व्यक्त केले आहे. याचवेळी हल्ल्यातील जखमींसाठी एक मोठी घोषणा देखील केली आहे.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक मुकेश धीरूभाई अंबानी म्हणाले, पहलगाम येथील क्रूर दहशतवादी हल्ल्यात निष्पाप भारतीयांच्या मृत्युबद्दल रिलायन्स कुटुंब दु:ख व्यक्त करते. आम्ही पीडित कुटुंबांना आमच्या मनापासून सहवेदना व्यक्त करतो. हल्ल्यात जखमी झालेले सर्वजण जलद आणि पूर्ण बरे व्हावेत यासाठी आम्ही प्रार्थना करतो. मुंबईतील आमचे रिलायन्स फाउंडेशन सर एचएन हॉस्पिटल सर्व जखमींना मोफत उपचार देईल. ते पुढे म्हणाले, दहशतवाद हा मानवतेचा शत्रू आहे. त्याचे कोणत्याही प्रकारे आणि कोणत्याही व्यक्तीने समर्थन करू नये. दहशतवादाच्या धोक्याविरुद्धच्या निर्णायक लढाईत आम्ही माननीय पंतप्रधान, भारत सरकार आणि संपूर्ण देशासोबत आहोत.

जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला झाला. यामध्ये २९ जणांचा मृत्यू झाला आहे. या हल्ल्यानंतर पहलगाम खो–यात दहशतीचे वातावरण आहे. आता लोक तिथे जायलाही भीत आहेत. पहलगाममध्ये जिथं हा हल्ला झाला त्या भागाला मिनी स्वित्झर्लंड असेही म्हटले जाते. या ठिकाणी फक्त देशातूनच नाही तर विदेशातूनही पर्यटक येतात. मात्र, २२ एप्रिलला दुपारी येथील दहशतवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार केला. यात २९ निष्पाप लोक बळी पडले.

# उद्योजकांच्या अडचणी समन्वयातून वेळेत सोडविणार

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया । जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक

● **नगर । वीरभूमी –**

औद्योगिक क्षेत्रामध्ये उद्योजकांना वीज, रस्ते, पाणी यासह इतर मुलभूत सुविधा मुबलक प्रमाणात उपलब्ध करुन देण्याबरोबरच उद्योजकांच्या अडचणी समन्वयातून वेळेत सोडविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा उद्योग मित्र समितीच्या बैठकीत डॉ. आशिया बोलत होते. बैठकीस जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अतुल दवंगे, कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी आशिष नवले, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक सोमनाथ जगताप,उद्योग अधिकारी अशोक बेनके, बालाजी बिराजदार यांच्यासह उद्योग मित्र संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ.पंकज आशिया म्हणाले, औद्योगिक क्षेत्राकडे जाणाऱ्या रस्त्यांवर वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. सुरळीत वाहतुकीसाठी उपाययोजना करण्यात याव्यात. औद्योगिक क्षेत्रामध्ये अनधिकृतपणे स्टॉलधारक व्यवसाय करत असल्याच्या तक्रारी आहेत. असे स्टॉल जप्त करण्यात यावेत. औद्योगिक क्षेत्रात सुरक्षिततेच्यादृष्टीने पोलीस गस्त वाढवण्यात यावी. त्याठिकाणी पोलीस चौकी उभारण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

औद्योगिक क्षेत्राला पुरेशा प्रमाणात विद्युत पुरवठा करण्यासाठी ट्रान्सफार्मर दुरुस्ती, विद्युत वितरणामध्ये येणारे अडथळे प्राधान्याने दूर करण्यात यावेत. परिसरामध्ये विद्युत सबस्टेशन उभारणीसाठी जागा उपलब्धतेबाबत कार्यवाही करावी. क्षेत्रामध्ये असलेल्या ड्रेनेजची पावसाळयापूर्वी स्वच्छता करण्यात यावी. त्याचबरोबर कचऱ्याची नियमितपणे विल्हेवाट लावत परिसर स्वच्छ राहील यादृष्टीनेही आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.



औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांना आयुष्यमान भारत योजनेतून आरोग्याच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. औद्योगिक क्षेत्राच्या भागामध्ये खासगी दवाखाने असल्यास त्यांच्या माध्यमातून सेवा देण्याच्यादृष्टीने प्रयत्न करण्यात यावेत. या भागामध्ये असलेल्या विविध चौकांच्या सौंदर्यीकरणाची कामे सीएसआरच्या माध्यमातून करण्यात यावीत. औद्योगिक क्षेत्रामध्ये कौशल्यावर आधारित प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी जागेची तपासणी करण्याच्या सूचनाही डॉ. आशिया यांनी यावेळी दिल्या.

यावेळी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अतुल दवंगे यांनी विषयाशी संबंधित माहिती दिली.

SPOT NEWS

## राजेंद्र कंत्रोड यांचा घर घर लंगर सेवेच्या वतीने सत्कार



**नगर । वीरभूमी–**
शहरातील श्री रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीत संचालकपदी निवडून आल्याबद्दल राजेंद्र कंत्रोड यांचा घर घर लंगर सेवेच्या वतीने सन्मान करण्यात आला. तारकपूर येथील लंगर सेवेच्या अन्न छत्रालयात साहित्यिक तथा कवी इंजी. देवेंद्रसिंह वधवा आणि घर घर लंगर सेवेचे जनक जनक आहुजा यांनी राजेंद्र कंत्रोड यांचा सत्कार केला. याप्रसंगी मनिषाकौर वधवा, हरजितसिंह वधवा, प्रितपालसिंह धुप्पड, सतीश गंभीर, मुन्ना जग्गी, राजू जग्गी, गुलशन कंत्रोड, प्रशांत मुनोत, सोमनाथ चिंतामणी आदी उपस्थित होते. इंजी. देवेंद्रसिंह वधवा म्हणाले की, राजेंद्र कंत्रोड हे केवळ सहकार क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तीमत्व असून, सामाजिक क्षेत्रातही ते कायम सक्रिय असतात. गरीब व गरजूंना मदत करणे, लोकांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणे, ही त्यांची कार्यशैली आहे. संचालक म्हणून त्यांच्या निवडीने संस्थेचा विकास वेगाने होईल, असा आमचा विश्वास असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जनक आहुजा म्हणाले की, आपल्या समाजात सामाजिक जाणीव असलेल्या व्यक्तींनी पुढे येणे ही काळाची गरज आहे. राजेंद्र कंत्रोड यांनी त्या जबाबदारीचे भान ठेवून काम करत आहे. त्यांच्या अभ्यासू व्यक्तीमत्वाचा संस्थेला व संचालक मंडळाला फायदा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## चंद्रकांत गायकवाड यांना लक्षवेध कृषी पत्रकारीता पुरस्कार प्रदान



**तिसगाव । वीरभूमी–**
पाथर्डी तालुक्यातील श्रीक्षेत्र हनुमान टाकळी येथील चंद्रकांत अर्जुनराव गायकवाड यांना कोल्हापुर किल्ले पर्यटन महोत्सवांत लक्षवेध कृषी पत्रकारीता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र किल्ले पर्यटन सेवा संस्थेच्या वतीने राजर्षी शाहू महाराज नाट्यगृहांत रविवारी संपन्न झालेल्या लक्षवेध सामाजीक संमेलनांत सिने अभिनेते स्वप्नील राजशेखर, अभिनेत्री शुभांगी गायकवाड, चित्रपट निर्माता महामंडळ अध्यक्ष बाळासाहेब गोरे, गितांजली डोंबे, स्वागताध्यक्ष डॉ. बी. एन. खरात आदींचे हस्ते गायकवाड यांना पुरस्काराचे वितरण झाले. राज्यांतील नाट्य, सिनेमा, लोककला, क्रीडा, गिर्यारोहक, पत्रकारीता क्षेत्रांतील ६३ गुणवंतांना लक्षवेध पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

# वक्फ बोर्ड नोंदणी रद्द करण्यासाठी अमीन शेख यांचे पत्र दिशाभूल करणारे : गोपाळ मोटे पाटील

**श्रीगोंदा । वीरभूमी–**
श्रीगोंदा शहरातील शेख महंमद बाबा दर्गा ट्रस्टचे अध्यक्ष व महाराजांचे तथाकथित वंशज अमीन शेख यांनी २२ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे शेख महंमद बाबा दर्गा न्यासाची वक्फ बोर्ड नोंदणी रद्द करण्याची मागणी निवेदन देत केली होती. मात्र यात त्यांनी महाराष्ट्र सरकारने वक्फ बोर्डाकडे हस्तांतरण करण्याचे परिपत्रक काढल्याचे म्हटले आहे. हे परिपत्रक केवळ मुस्लिमांच्या धार्मिक स्थळासाठी लागू असून संत श्री शेख महंमद महाराज देवस्थानासाठी ते लागू होत नसल्यामुळे वक्फ बोर्डाकडे त्याची नोंदणी होण्याचा संबंध नव्हता त्यामुळे अमीन शेख यांनी दिलेले निवेदन दिशाभूल करणारे असा आरोप संत श्री शेख महंमद महाराज यात्रा उत्सव समितीचे अध्यक्ष गोपाळराव मोटे पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकात केला आहे.

पत्रकात त्यांनी पुढे म्हटले आहे की, अमीन शेख यांनी महाराजांचे धर्मादाय आयुक्त यांच्याकडे मूळ नोंदणी असलेले महमंद बुवा देवस्थान मठ हे नाव बदलून शेख महमंद बाबा दर्गा ट्रस्ट असे नाव करत राष्ट्रीय एकात्मतेचे व हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेल्या महाराजांचा संपूर्ण इतिहास बदलून महाराजांना केवळ मुस्लिम धर्मापर्यंत मर्यादित करण्याच्या उद्देशाने न्यासाच्या घटनेत बदल करत हव्या त्या पध्दतीने मूळ हेतू व उद्देशात बदल करून हे देवस्थान जाणीवपूर्वक वक्फ बोर्डाकडे नोंदणी केले. त्याचा नोंदणी क्रमांक MSBW १२०/२००८ असताना निवेदनात मात्र ३२४/२००८ असा दिशाभूल करणारा नंबर लिहला आहे. तसेच धर्मादाय आयुक्तांकडे झालेली नोंदणी इ ७१/१९५३ असताना त्याचा नंबर जाणीवपूर्वक ए ७१/१९५३ केलेला आहे. हे निवेदन देत असताना संस्थेच्या रजिस्टर लेटरहेड व रबरी शिक्के चा वापर न करता साध्या कागदावर निवेदन देताना केवळ अध्यक्ष म्हणून सही केली असून सचिव याची सही केली नाही. शेख यांचा हेतू शुद्ध नसून चुकीचे व दिशाभूल करणारे मजकूर देऊन व सध्याचे वातावरण शांत झाल्यावर पुन्हा न्यायालयात जाण्याचा हेतू दिसतो. निवेदनात त्यानी काही नेते जातीय तणाव निमार्ण करतात असे म्हटले आहे. मात्र शेख यांनी इतिहास बदलून दर्गा ट्रस्ट करण्याचा केलेला प्रयत्न तसेच २००८ साली सुफी संत हजरत शेख महंमद बाबा असे आक्षेपार्ह व वादग्रस्त पुस्तक छापून सामाजिक सलोखा बिघडुन कायदा सुव्यवस्था प्रश्न निर्माण केला होता. असे आक्षेपार्ह पुस्तक वाटू नको असे सांगणाऱ्या महाराज यांचे मानकरी व यात्रा उत्सव साजरा करणारे यांच्यावर शेख परिवाराने हल्ला केला होता. यावेळी शांतता निर्माण करणे कायदा सुव्यवस्था पाळणे यासाठी ज्या नेत्यांनी प्रयत्न केला. त्याच नेत्यांवर निराधार आरोप या निवेदनात त्यांनी केला आहे.



आमीन शेख यांचे निवेदन हे प्रशासन व गावकऱ्यांची दिशाभूल करणारे असून खरोखरच त्यांना तोडगा काढायचा असेल तर त्यांनी स्वतः होउन या नोंदणी रद्द करण्यासाठी वक्फ बोर्ड कार्यलयात जावून अर्ज द्यायला पाहिजे होता. मात्र हा अर्ज जिल्हाधिकारी यांच्याकडे देणे ही शुध्द फसवणूक आहे. त्यांनी नोंदणी रद्द करण्यासाठी वक्फ बोर्ड आणि धर्मादाय आयुक्त यांच्याकडे कागदोपत्री पाठपुरावा केला तरच हा वाद मार्गी लागू शकतो, असे यात्रा उत्सव प्रतिष्ठानचे अध्यक्ष गोपाळराव मोटे पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. श्री. मोटे यांनीही याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे.

## पहलगाम मधील भ्याड दहशतवादी हल्ल्याचा निषेध



**नगर । वीरभूमी–**
काश्मीर खोऱ्यातील पहलगामजवळील बायसरन परिसरात झालेल्या अमानवी व भ्याड दहशतवादी हल्ल्याचा घर घर लंगर सेवेच्या वतीने निषेध करण्यात आला. या हल्ल्यात बळी पडलेल्या २६ निरपराध नागरिकांना तारकपूर येथील अन्न छत्रालयात भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या श्रद्धांजली कार्यक्रमात जनक आहुजा, हरजितसिंह वधवा, प्रितपालसिंह धुप्पड, राजेंद्र कंत्रोड, सतीश गंभीर, मुन्ना जग्गी, राजू जग्गी, गुलशन कंत्रोड, प्रशांत मुनोत, सनी वधवा, सोमनाथ चिंतामणी, सुनिल थोरात, कैलाश नवलानी, डॉ. संजय असनानी आदी उपस्थित होते. उपस्थितांनी दहशतवादाचा जोरदार निषेध व्यक्त करुन भारत सरकारने याविरोधात ठोस पावले उचलण्याची मागणी केली.

जनक आहुजा म्हणाले की, काश्मीरमध्ये निष्पाप नागरिकांवर अमानुषपणे हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांनी संपूर्ण मानवजातीवरच आघात केला आहे. पाकिस्तानसारखे शत्रूराष्ट्र दहशतवादी संघटनांना पाठीशी घालून भारताच्या अखंडतेवर घाला घालत आहेत. हा हल्ला म्हणजे मानवतेवर झालेला घात आहे. भारत सरकारने आता यापुढे शांत राहू नये आणि कठोर भूमिका घेण्याचे त्यांनी स्पष्ट केले.

हरजितसिंह वधवा म्हणाले की, दहशतवाद्यांच्या या कायर कृतींना आता तोंड द्यावे लागेल. धर्माच्या नावावर अशा प्रकारचे हिंसाचार घडवणे ही मानवतेची विटंबना आहे. काश्मीरमध्ये सातत्याने अशांतता माजवण्याचे षड्यंत्र रचले जात आहे. भारताने आता ठोस आणि निर्णायक धोरण स्वीकारण्याची वेळ आली असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाच्या शेवटी दोन मिनिटे मौन पाळून हल्ल्यात बळी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली. या प्रसंगी भारत माता की जय..., पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा देण्यात आल्या.

## सहकार चळवळीतील बिनविरोध यशाचे साक्षीदार वयोवृद्ध शेतकरी; निमोण येथे माजी मंत्री थोरात यांना आशिर्वाद

**संगमनेर । वीरभूमी–**
सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या जवळपास बिनविरोध झालेल्या निवडणुकीनंतर निमोण येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात वयोवृद्ध शेतकऱ्यांनी माजी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांची भेट घेतली. या भेटीत भावनिक वातावरण निर्माण झाले होते. गेल्या अनेक दशकांपासून सहकार क्षेत्रात कार्यरत असलेले अनेक ज्येष्ठ, सभासद नागरिक व शेतकरी या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांनी मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांच्याशी संवाद साधत जुन्या आठवणी शेअर केल्या आणि त्यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.

निमोण येथे कारखाना सभासद शेतकरी व युवक यांच्या स्नेह मेळाव्या प्रसंगी मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.



यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले, ही निवडणूक म्हणजे सहकार चळवळीवरील लोकांचा विश्वास आहे. वयोवृद्ध शेतकऱ्यांचा अनुभव आणि आशीर्वाद हेच आमचं खरं बळ आहे. कार्यक्रमात वयोवृद्धांनी आपल्या भावना व्यक्त करत थोरात कुटुंबाच्या सहकार क्षेत्रातील योगदानाचे कौतुक केले. काहींनी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्यासोबतचे अनुभव सांगत जुन्या काळातील सहकार्याची आठवण करून दिली. याप्रसंगी लोकनेते बाळासाहेब थोरात यांनीही प्रत्येकाशी आपुलकीने संवाद साधत, त्यांचा सन्मान केला. वयोवृद्ध शेतकऱ्यांचा आशीर्वाद आणि अनुभव हीच खरी संपत्ती आहे. त्यांचं मार्गदर्शन आम्हाला नेहमीच प्रेरणा देतं, असं ते म्हणाले.

कार्यक्रमात वातावरण अत्यंत उत्साही आणि भावनिक होतं. उपस्थित वयोवृद्ध सभासद व शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचं हास्य झळकत होतं.

या कार्यक्रमात शेकडो शेतकरी सहभागी झाले होते. त्यामध्ये अनेक ज्येष्ठ शेतकरीही होते, जे गेली अनेक दशके सहकार क्षेत्राशी निगडित आहेत. त्यांनी लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्याशी गप्पा मारत जुन्या आठवणींना उजाळा दिला. काहींनी स्वातंत्र्य सेनानी भाऊसाहेब थोरात यांच्यासोबत केलेल्या सहकार चळवळीच्या आठवणीही सांगितल्या. यावेळी पुढील पिढी असणारी युवकांची उपस्थिती मोठी होती.

विधानसभेत लोक नेतृत्वाचा पराभव नको होता – वयोवृद्ध शेतकऱ्याच्या भावनांनी भरलेल्या स्पर्शाने अंतकरण दाटून आले.

विधानसभा निवडणुकीत माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचा पराभव हा मोठा घात झाला आहे. या स्नेहसंवाद मिळाव्यात एका वयोवृद्ध शेतकऱ्याने माजी मंत्री थोरात यांची भेट घेतली. खऱ्या अर्थाने थोरात साहेबांचा पराभव होणे योग्य नव्हते, असे सांगत त्या शेतकऱ्याने लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या चेहऱ्यावरून हात फिरवला. त्या क्षणी सर्व उपस्थितांचे अंतकरण दाटून आले होते, यावेळी ज्येष्ठ नागरिकांच्या डोळ्यांतून भावना ओसंडून वाहत होत्या. हे दृश्य उपस्थितांच्या मनाला चटका लावणारे ठरले.

# नाफेड व एनसीसीएफ कडून होणाऱ्या कांदा खरेदी घोटाळ्याची चौकशी करा

### स्वतंत्र भारत पक्षाचे अध्यक्ष अनिल घनवट यांची मागणी

**श्रीगोंदा । वीरभूमी–**
कांद्याचे दर नियंत्रित ठेवण्यासाठी नाफेड व एनसीसीएफ मार्फत होणाऱ्या कांदा खरेदीत मोठ्या प्रमाणात घोटाळा होत असतो. नाफेड, एनसीसीएफचे पदाधिकारी व अधिकारी तसेच फेडरेशनचे प्रमुख मिळून सरकारी तिजोरीवर डल्ला मारत आहेत. या गैरव्यवहाराची चौकशी व्हावी अशी मागणी स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांना पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

यामध्ये श्री. घनवट यांनी म्हटले आहे की, भारत सरकारच्या ग्राहक व्यवहार मंत्रालयाने नाफेड व एनसीसीएफ या दोन एजन्सी यांची कांदा खरेदी, साठवणूक व वितरणासाठी नेमणूक सुरू केली आहे. ज्या वेळेस बाजारात कांद्याचा तुटवडा होऊन कांद्याचे दर वाढण्यास सुरुवात होते तेव्हा हा कांदा बाजारात विकून कांद्याचे दर नियंत्रित केले जातात.

ज्या संस्थांना कांदा खरेदीची जबाबदारी दिली जाणार आहे त्याची निवड प्रक्रिया पारदर्शक नाही. एकूण कांदा खरेदी, साठवणूक व वितरण बाबत अत्यंत गोपनीयता पाळली जाते. माहिती अधिकारात अर्ज केले तरी माहिती देण्यास टाळाटाळ केली जाते. ज्या संस्थांचा मागील व्यवहार अतिशय संशयास्पद, भ्रष्ट व अप्रामाणिक राहिला आहे, ज्यांनी सरकारी निधीचा अपहार केला आहे त्यांना पुन्हा कांदा खरेदीची जबाबदारी देणे कितपत योग्य होणार आहे?

यावर्षी होणाऱ्या कांदा खरेदीत नाफेड, एफपीओच्या फेडरेशनला न देता सहकारी संस्थांना देणार आणि एनसीसीएफ मात्र सहकारी संस्था तसेच एफपीओ फेडरेशन या दोन्हींना खरेदीचे अधिकार देणार असल्याचे समजते. असे केल्याने ही व्यवस्था सुधारण्याची काही शक्यता दिसत नाही. ज्या सहकारी संस्थांना ही जबाबदारी दिली जाणार आहे त्याची आर्थिक आणि साठवणुकीसाठी आवश्यक क्षमतेची पडताळणी नाफेड करणार आहे का? या नवीन व्यवस्थेमुळे कांदा खरेदी व वितरणातील भ्रष्टाचार संपणार आहे का? हा खरा प्रश्न आहे.



कांदा खरेदीचा परवाना मिळण्यासाठी लाखो रुपये द्यावे लागतात अशी चर्चा आहे. नाफेडचे विद्यमान अध्यक्ष यांनी, कांदा खरेदी करणाऱ्या काही संस्थांवर धाड टाकली होती. त्यात अनेक आक्षेपार्ह बाबी समोर आल्या होत्या. त्याचे पुढे काहीच झाले नाही. मात्र त्या नंतर जास्त गैरप्रकार झाल्याचे दिसून येत आहेत.

काही फ्रेडरेशने कांदा खरेदी न करता फक्त कागदोपत्री साठा दाखवला. कांद्याचे दर वाढल्या नंतर काही फ्रेडरेशनने साठवलेला नाफेड व एनसीसीएफचा उन्हाळ कांदा बाजारात विकला. नंतर कांदा देण्याच्या वेळेस स्वस्त लाल कांदा देऊन भरपाई केली आहे. महाराष्ट्रातून गोवा, कर्नाटक, बिहार, उत्तरप्रदेश आदी राज्यांमध्ये अनुदानित दरात पुरविण्यात आला होता. या पैकी अनेक राज्यात कांदा न पाठवता खोटी कागदपत्र तयार करून मोठ्या रकमेचा अपहार केला आहे. ग्राहक व्यवहार विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीत कांदा चाळीत कांदा दिसून आला नाही. करदात्यांच्या पैसा व सरकारी तिजोरीवर डल्ला मारण्यात नाफेड, एनसीसीएफ, फेडरेशन व काही शेतकरी सहभागी आहेत असा आरोप अनिल घनवट यांनी केला आहे. या घोटाळ्याची सखोल चौकशी व्हायला हवी अशी मागणी घनवट यांनी ग्राहक व्यवहार मंत्रालयाला पाठवलेल्या निवेदनात केली आहे.

यावर्षी होणाऱ्या कांदा खरेदीवर. स्वतंत्र भारत पक्ष व शेतकरी संघटना बारकाईने नजर ठेवणार असून सरकारी निधीची लूट करणाऱ्यांना समाजा समोर उघड करण्याचा प्रयत्न करणार आहे. शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी किरकोळ कमिशनसाठी भ्रष्ट फ्रेडरेशनकडून आपल्या बँक खात्यावर पैसे स्विकारू नयेत. ज्या शेतकऱ्यांच्या खात्यावर कांदा विक्रीचे पैसे येतात त्यांनी खरोखर त्या किमतीचा कांदा नाफेड किंवा एनसीसीएफला दिला आहे का याची शहानिशा केली जाईल.

महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकरी, ग्राहक व सरकारी तिजोरीची लूट थांबवण्यासाठी राजकीय पुढारी, व्यापारी, फेडरेशन व भ्रष्ट अधिकारी यांची अभद्र युती कायमची तोडण्यासाठी कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी जागरूक रहावे आणि स्वतंत्र भारत पक्ष व शेतकरी संघटनेला सहकार्य करावे असे आवाहन स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, अनिल घनवट यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात केले आहे.

SPOT NEWS

## समर्थ विद्यालयाच्या ४२ विद्यार्थ्यांचे प्रज्ञाशोध परीक्षेत यश

**नगर । वीरभूमी-**

यंदा शाळेचे तथा संस्थेचे नाव ह्या ४२ विद्यार्थांनी जसे मोठे केले तसेच पुढील वर्षी १४२ मुलांनी प्रशालेचे व संस्थेचे नाव जगभरात खूप मोठे करावे असे प्रतिपादन श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सचिव तथा शालेय समिती चेअरमन सुरेश क्षीरसागर यांनी केले. सर्व गुणवंत व प्रज्ञावंत विद्यार्थ्यांच्या कौतुक सोहळा प्रसंगी क्षीरसागर बोलत होते. श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सचिव व प्राथमिक विभागाचे शालेय समिती चेअरमन सुरेश क्षीरसागर हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सदस्य स्वप्निल कुलकर्णी, प्रशालेच्या मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. हे युग स्पर्धेचे आहे, अशा कौतुक सोहळ्यातून मुलांच्या पाठीवर पडलेली शाबासकीची थाप आगामी काळात प्रेरणा देण्यास पोषक ठरते. पालकांनी देखील खूप उत्साही असणे अतिशय महत्वाचे आहे. पालक व शिक्षकांनी मुलांवर घेतलेली ही मेहनत संस्थेसाठी नक्कीच भूषणावह ठरेल व भविष्यात देखील अशीच कामगिरी नोंदवत पालकांचे, शिक्षकांचे, शाळेचे व पर्यायाने संस्थेचे नाव उंचावत रहा असे मनोगत क्षीरसागर यांनी व्यक्त केले. प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर यांनी प्रास्ताविकातून आपल्या भावना मांडल्या. संगीतशिक्षिका सौ.वर्षा खणकर व विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. पालकांमधून सौ. अर्चना दळवी व सौ. भंडारी यांनी आपल्या मनोगतातून सर्वांचे अभिनंदन केले व हे शिक्षकांच्या मेहनतीने यश आहे, संस्था सतत मुलांच्या कलागुणांना वाव देते. असे त्या म्हणाल्या. व सर्वांना पुढील वाटचालसाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी सर्व ४२ विद्यार्थ्यांसह त्यांचे मार्गदर्शक शिक्षक - भगवान जाधव, गणेश पारधे, श्रीमती अश्विनी जाधव, सौ.पूजा खटावकर, वृषाली कुलकर्णी, श्रीमती संपदा नगरकर, श्रीमती प्रियंका कासार, सौ. प्राची देशमुख व सौ. अंजली देशपांडे यांचे देखील विशेष कौतुक केले गेले. सर्व शिक्षक तसेच सर्व गुणवंत विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली. यादीवाचन श्रीमती संपदा नगरकर यांनी तर आभार गणेश पारधे यांनी मानले. सूत्रसंचालन प्राची देशमुख व अंजली देशपांडे यांनी केले.

## शेतीच्या वादातून महिलेला मारहाण; गुन्हा दाखल

**नगर । वीरभूमी-**

शेतीच्या वादातून एका महिलेस दगडाने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना वाळकी (ता. अहिल्यानगर) शिवारात शेत गट नंबर ३५९ मध्ये मंगळवारी (२२ एप्रिल) सकाळी सहाच्या सुमारास घडली आहे. यात मिरा बबन कासार (वय ५०, रा. शिरकांड मळा, वाळकी) या जखमी झाल्या आहेत. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाबासाहेब महादेव कासार, स्वाती देविदास कासार, प्रवीण तुळशिराम कासार, महेश तुळशिराम कासार, देविदास बाबासाहेब कासार, जनाबाई बाबासाहेब कासार, कोमल प्रवीण कासार (सर्व रा. वाळकी, ता. अहिल्यानगर) यांच्या विरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महिला व साक्षीदार संशयित आरोपींनी शेतात टाकलेले दगड उचलत असताना संशयित आरोपींनी ही शेती आमची आहे असे म्हणत, फिर्यादी व साक्षीदारांवर दगड फेकून मारहाण केली. त्यानंतर शिवीगाळ करत तुमच्यातील प्रत्येकाला ठेचून टाकू, तुम्हाला जेसीबीच्या बकेटखाली गाडून टाकू अशी धमकी दिली. तसेच विहिरीवरील पाणी वापरल्यास जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. घटनास्थळी तालुका पोलिसांनी भेट दिली असून गुन्ह्याची नोंद केली आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार माने करत आहेत.

# लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बिऱ्हाड आंदोलन

**वडगाव गुप्ता येथील अतिक्रमण धारक कुटुंबीयांना बेघर केल्याने त्या ठिकाणी पुनर्वसन करून देण्याची मागणी**

**नगर । वीरभूमी-**

वडगाव गुप्ता (ता. नगर) हद्दीतील सरकारी जागेत अनेक वर्षांचे अतिक्रमण असलेल्या अनुसूचित जाती-जमाती व भटक्या, विमुक्त प्रवर्गातील कुटुंबीयांचे अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली त्यांना बेघर केले असून त्यांना त्या ठिकाणी पुनर्वसन एका बाजूस करण्याच्या मागणीसाठी लहुजी शक्ती सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन दिली होती मात्र कुठलेही कारवाई झाली नसल्याने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बिऱ्हाड आंदोलन चालू करण्यात आले.

यावेळी लहुजी शक्ती सेनेचे महाराष्ट्र राज्य सदस्य संजय वाल्हेकर, अहिल्यानगर जिल्हा प्रमुख सुनील शिंदे, जिल्हा समन्वयक किरण कणगरे, सिताराम शिरसाठ, पिनू भोसले, नाना जगताप, वंचित बहुजन आघाडीचे अनिल जाधव, बहुजन नेते सुधीर वैरागर, किशोर ससाने, स्वाती साठे, नंदू माळी, बाळासाहेब जाधव, रावसाहेब पवार, सोमनाथ जाधव, सोनू शिंदे, शिवानी माळी, गोपीनाथ शिंदे, सोनू भोसले, ऋतिक भोसले, ओंकार भोसले, बिरकी काळे, साईनाथ चव्हाण, रोहित भोसले, प्रिया चव्हाण, लताबाई चव्हाण, उज्वला चव्हाण आदीसह बेघर



कुटुंबीय उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हंटले आहे की, वडगाव गुप्ता (ता. नगर) येथील महाराष्ट्र शासनाच्या गट नंबर ५९५/१ मधील शासकीय मोकळ्या जागेवर गेल्या २५ ते ३० वर्षांपासून अनुसूचित जाती-जमाती व भटक्या, विमुक्त प्रवर्गातील नागरिक राहत आहे. काही कुटुंबीय पक्के घर करून, तर काही झोपड्यात राहत आहे. त्यांना वडगाव गुप्ता ग्रामपंचायतीने नळ कलेक्शन दिले असून, ते पाणीपट्टी देखील ते भरत आहे. त्याचप्रमाणे विद्युत महावितरण मार्फत त्यांना लाईट मीटर घेण्यात आले असून, त्याचे बिल देखील ते अदा करत आहेत. अनेक वर्षापासून वास्तव्य असल्याने त्यांचे मतदार यादीतही नाव समाविष्ट असून, नुकतेच त्यांना नोटीसद्वारे जागा खाली करण्याचे सांगण्यात आले आहे. अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली हा उपेक्षित वर्ग बेघर केले व त्यामध्ये विविध जाती धर्माच्या लोकांची घरे पाडून त्यांना बेघर करण्यात आलेले आहे त्याची फार दैनिक अवस्था झालेली असून उपासमारीची वेळ आली आसून ज्या पद्धतीने ५९५/१ मधील काही क्षेत्र जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या विखे फाऊंडेशनला ज्या पद्धतीने दिलेली आहे व काही ग्रामपंचायतीच्या माध्यमातून स्थानिक लोकांच्या नावावर करून दिलेली आहे त्याच पद्धतीने अतिक्रमण धारकांना न्याय देऊन त्यामध्ये दोन हेक्टर क्षेत्र शिल्लक आहे त्यामध्ये अतिक्रमण धारकांना विचारात घेऊन पुनर्वसन करण्याची मागणी केली होती मात्र कुठल्याही प्रकारची कारवाई झाली नसल्याने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बिऱ्हाड आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

## मनपा करणार सीनानदी पात्रासह जलस्त्रोतांची स्वच्छता

**नगर । वीरभूमी-**

जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधून राज्य शासनामार्फत १ मे पर्यंत आराधना वसुंधरेची हे अभियान राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरातही शनिवारी व रविवारी शहरातील जलस्त्रोतांची साफसफाई करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली. या अभियानात नागरिक व स्वयंसेवी, सामाजिक संस्थांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे. शहरात शनिवारी (२६ एप्रिल) नागापूर पूल जवळ, व स्टेशन रस्त्यावरील पूल जवळ सीना नदी पात्र, लगतचा परिसर व रविवारी (२७ एप्रिल) अहिल्यानगर-पुणे रस्त्यावर इलाक्षी शोरूम जवळ, कल्याण रस्त्यावर असलेल्या पुला जवळील सीना नदी पात्र, लगतचा परिसर स्वच्छ करण्यात येणार आहे. यासह आठरे पाटील पब्लिक स्कूल येथील विहीर, बाळाजी बुवा विहीर येथे अभियान राबविण्यात येणार आहे. नागरिकांनी व स्वयंसेवी, सामाजिक संस्थांनी यात सहभागी व्हावे, वसुंधरेचे जतन, हेच अहिल्यानगरचे वचन यानुसार वसुंधरेच्या रक्षणासाठी नागरिकांनीही पुढाकार घ्यावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे. स्वयंसेवक म्हणूनही सहभागी व्हावे व या कार्यात मदत करावी, त्यासाठी घनकचरा व्यवस्थापन प्रमुख अशोक साबळे यांच्याशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे. आराधना वसुंधरेची या अभियानातून जलस्त्रोतांचे शुद्धीकरण होऊन पाण्याचा दर्जा सुधारेल. जलप्रदूषण कमी होऊन नागरिकांसह जलजीवन वाचेल. पाण्यातील जैवविविधता (मासे, जलवनस्पती) सुरक्षित राहतील व पर्यावरणाचा समतोल राखला जाईल, असे आयुक्त डांगे यांनी म्हटले आहे.

## ४८ ग्रामपंचायतीचे सरपंचपद महिलांसाठी राखीव

**शेवगाव । वीरभूमी-**

तालुक्यातील ९४ ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त सरपंचपदासाठी बुधवारी आरक्षण सोडत झाल्यानंतर गुरुवारी महिला आरक्षणाची सोडत काढण्यात आली. यामध्ये अनुसुचित जाती ५, अनुसुचित जमाती १, नागरीकांचा मागास प्रवर्ग १३ व सर्वसाधारण २९ अशा एकुण ४८ ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंचपद महिलांसाठी राखीव झाले आहे. तर उर्वरीत ४६ ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंचपद व्यक्तींसाठी राहीले आहे.

शेवगाव तहसील कार्यालयात गुरुवार दि. २५ रोजी दुपारी ३.३० वाजता प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार प्रशांत सांगडे, नायब तहसीलदार दीपक कारखिले, गौरी कट्टे यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकनियुक्त सरपंचपदासाठी महिला आरक्षण सोडत महिला आरक्षणाची सोडत श्रीकृष्ण सुरेश बर्डे (वय-८) या मुलाच्या हस्ते काढण्यात आली. या सोडतीमध्ये अनुसुचित जाती महिला ५, अनुसुचित जाती व्यक्ती ५, अनुसुचित जमाती महिला १, अनुसुचित जमाती व्यक्ती १, नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला १३, नागरीकांचा मागास प्रवर्ग व्यक्ती १२, सर्वसाधारण महिला २९, सर्वसाधारण व्यक्ती २८ अशा ४८ ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंचपद महिलांसाठी राखीव असणार आहे.

**लोकनियुक्त सरपंचपदासाठी गावानिहाय आरक्षण पुढीलप्रमाणे : अनुसुचित जाती महिला** - सालवडगाव, सोनेसांगवी, कोनोशी, दहिफळ जुन, कांबी. **अनुसुचित जाती व्यक्ती** - मंगरुळ खुर्द, सुलतानपूर बुद्रक, राणेगाव, थाटे , हसनापूर. **अनुसुचित जमाती महिला** - सामनगाव, **अनुसुचित जमाती व्यक्ती** - ढोरजळगाव ने.

**नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला** - खामपिंप्री नविन, मळेगाव शे, विजयपुर, लखमापूरी, नागलवाडी, निंबे, ताजनापूर, चापडगाव, खरडगाव, वरुर बुद्रुक, आव्हाणे बुद्रुक, अधोडी, शहरटाकळी. **नागरीकांचा मागास प्रवर्ग व्यक्ती**- लाखेफळ, आखेगाव तितर्फा, बेलगाव, दहिगावने, लोळेगाव, तळणी, एरंडगाव समसुद, चेडेचांदगाव, ठाकुर निमगाव, खानापूर, सुलतानपूर खुर्द, खडके.

**सर्वसाधारण महिला** - मंगरुळ बुद्रुक, गदेवाडी, गायकवाड जळगाव, शेकटे खुर्द, भाविनिमगाव, प्रभुवाडगाव, रांजणी, शेकटे बुद्रुक, बालमटाकळी, हिंगणगाव-ने, सुकळी, ठाकुर पिंपळगाव, वरखेड, देवटाकळी, खुंटेफळ, ढोरसडे, वाडगाव, दहिगाव-शे, लाडजळगाव, आखातवाडे, अमरापूर, अंतरवाली बुद्रुक, बक्तरपूर, हातगाव, अंतरवाली खुर्द, मडके, कोळगाव, घोटण, सोनविहीर.

**सर्वसाधारण व्यक्ती** - माळेगाव ने, खामपिंप्री जुनी, आव्हाणे खुर्द, ब-हाणपूर, भगूर, भातकुडगाव, बोधेगाव, बोडखे, दादेगाव, वाघोली, ढोरजळगाव शे, दिवटे, एरंडगाव भागवत, गोळेगाव, जोहरापूर, क-हेटाकळी, खामगाव, मजलेशहर, मुंगी, नजिक बाभुळगाव, पिंगेवाडी, शिंगोरी, दहिफळ नविन, कुरुडगाव, वडुले बुद्रुक, वडुले खुर्द, राक्षी, भायगाव.

# शेतकऱ्यांना पिक विम्याचा लाभ तातडीने मिळावा

**बाळासाहेब फटांगडे यांची कृषिमंत्र्यांकडे मागणी**

**शेवगाव । वीरभूमी-**

मागील २०२३-२४ या वर्षातील पिक विम्याचा लाभ शेतकऱ्यांच्या खात्यात तातडीने जमा करण्यात यावा, तसेच केवळ एक रुपया भरून शेतकऱ्यांना विमा संरक्षण मिळावे, यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब फटांगडे यांनी कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मागील वर्षीचा पिक विमा अद्यापही मिळालेला नाही. या संदर्भात स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून वारंवार निवेदने दिली गेली, तरीदेखील प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

फटांगडे यांनी सांगितले की,



शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सध्या अत्यंत बिकट आहे. नैसर्गिक आपत्ती आणि नापिकीमुळे शेतकऱ्यांवर एकामागोमाग एक संकटे येत आहेत. अशा वेळी सरकारने सुरू केलेली एक रुपयात पिक विमा योजना त्वरित लागू करणे गरजेचे आहे.

जर लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खात्यात पिक विम्याची रक्कम जमा झाली नाही, तर स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे जिल्ह्यात कोणताही शासकीय कार्यक्रम होऊ दिला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

या मागणीमुळे शेतकऱ्यांच्या समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधले गेले असून, आगामी काळात कृषी विभाग यावर काय भूमिका घेतो, याकडे स्वाभिमानी संघटनेचे लक्ष लागले असल्याचे फटांगडे यांनी सांगितले. याप्रसंगी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पक्ष जिल्हा अध्यक्ष रावसाहेब लवांडे, जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रेय फुंदे, तालुकाध्यक्ष मेजर अशोक भोसले, प्रशांत भराट, अमोल देवढे, मच्छिंद्र आर्ले, दादासाहेब पाचरणे, नानासाहेब कातकडे, हरिभाऊ कबड्डी, विकास साबळे, नारायण पायगण, मच्छिंद्र डाके, अंबादास भागवत यांच्या या निवेदनावर सह्या आहेत

# नैसर्गिक व सेंद्रिय शेतीला चालना देण्याचा प्रयत्न

**नीती आयोगाचे सल्लागार प्रमुख परिमल बनाफर यांचा शेतकऱ्यांशी संवाद**

**शिर्डी । वीरभूमी-**

केंद्र सरकारच्या नीती आयोगाचे सल्लागार प्रमुख परिमल बनाफर यांनी अलीकडेच अहिल्यानगर जिल्ह्याचा दौरा करून नैसर्गिक, सेंद्रिय व संरक्षित शेती करणाऱ्या शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. ग्रामीण विकास व शेती सक्षमीकरणाच्या उद्देशाने झालेल्या या दौऱ्यात अकोले, संगमनेर आणि राहाता तालुक्यांतील शेतकरी गटांशी त्यांनी चर्चा केली.

या दौऱ्यात शेतकऱ्यांनी त्यांच्यापुढे नैसर्गिक शेतीसाठी आवश्यक प्रशिक्षणाची कमतरता, जैविक बियाणे व खते यांची उपलब्धता, हवामान बदलाचा पिकांवर होणारा परिणाम, उत्पादनाची बाजारपेठांपर्यंत पोहोच व मूल्यनिर्धारण यांसारख्या महत्त्वाच्या अडचणी मांडल्या.

श्री.बनाफर यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी ऐकून घेतल्या व नीती आयोगाच्या पुढील धोरणात



आवश्यक बदल सुचविण्यात येतील, असे शेतकऱ्यांना आश्वस्त केले. त्यांनी शाश्वत शेतीचा अवलंब, स्थानिक स्तरावर प्रशिक्षण केंद्रांची गरज आणि शेतकऱ्यांना थेट बाजारपेठांशी जोडण्याच्या उपाययोजनांवर भर देण्याची गरज अधोरेखित केली.

शेतकऱ्यांनी नैसर्गिक व सेंद्रिय शेतीद्वारे उत्पादन खर्चात बचत करताना उत्पन्न वाढवण्यावर लक्ष केंद्रीत करावे, तसेच अशा शेतीमालाच्या विक्रीसाठी शेतकरी समूहांनी स्वतःच्या कंपन्या स्थापन कराव्यात, असा शब्दात त्यांनी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी प्र. उपविभागीय कृषी अधिकारी गोविंद कुलाळ, संगमनेर तालुका कृषी अधिकारी श्रीमती रेजा बोडके, अकोले तालुका कृषी अधिकारी सचिन गिरी, तसेच मंडळ कृषी अधिकारी रवींद्र रोकडे (अकोले), श्री राजेंद्र बिन्नर (समशेरपूर), श्री. चोपडे (राहाता) आणि विविध क्षेत्रीय कर्मचारी व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

या दौऱ्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये नैसर्गिक शेतीविषयी जागरूकता निर्माण झाली असून, शाश्वत शेतीप्रती सकारात्मक पाऊल उचलल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# पाथर्डीत पहलगाम हल्ल्याचा निषेध

## दहशतवाद्यांचा प्रतिकात्मक पुतळा जाळला । पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणांनी परिसर दणाणला

**● पाथर्डी । वीरभूमी–**

जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे हिंदू पर्यटकांवर धर्म विचारणा करून दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबाराचा पाथर्डी येथे सर्व हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने निषेध करण्यात आला. यावेळी दहशतवाद्यांचा प्रतिकात्मक पुतळा जाळण्यात आला व केंद्र सरकारने आता दहशतवाद्यांना कायमचा धडा शिकवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तालुका संघचालक अरविंद पारगावकर, भाजपचे ज्येष्ठ नेते अशोक चोरमले, मुकुंद गर्जे, नानासाहेब पालवे, किशोर परदेशी, रणजीत बेळगे, अर्जुन धायतडक, बाबासाहेब गीते, आशुतोष शर्मा, प्रतीक खेडकर, ज्ञानेश्वर सातपुते, सोमनाथ बंग, भाऊ तुपे, जगदीश काळे, सचिन वायकर, प्रताप तांदळे,निलेश इजारे आदींसह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना सर्वच वक्त्यांनी या भ्याड अतिरेकी हल्ल्याचा निषेध व्यक्त केला. हा अतिरेकी हल्ला जाणिवपूर्वक हिंदू पर्यटकांवर केल्याने देशात सर्वत्र सकल हिंदू समाजात चीड निर्माण झाली असल्याची



भावना व्यक्त केली. हे अतिरेकी भविष्यात कोणत्या दिशेने ही अतिरेकी चळवळ घेऊन जाणार असल्याचे या घटनेतुन दिसत असल्याने आगामी काळात सर्व हिंदुत्ववादी संघटना व हिंदू समाजाने यातुन धडा घ्यावा व संघटीतपणे या देशविरोधी ताकदींना जिहादी व अतिरेकी विचारसरणीला सडेतोड उत्तर देण्यासाठी सज्ज व्हावे असे आवाहन केले. देशातील शांतता व सुव्यवस्था शेजारील आर्थिक दिवाळखोर झालेल्या पाकिस्तानला व तेथील दहशतवादी संघटनांना पाहवत नसल्याने असे भ्याड हल्ले करत आहेत. निष्पाप पर्यटकांना त्यांचा नाव व धर्म विचारुन गोळ्या घालण्यात आल्याने हा हल्ला हिंदू विरोधी आहे. मानवतेला काळीमा फासणारा व देशाला अस्थिर करणारा असल्याने केंद्र सरकारने या हल्ल्याचे प्रतिशोध घ्यावा व संपूर्ण दहशतवादी चळवळीचा बिमोड करावा अशी मागणी केली. अशा हल्ल्यांनी हिंदू धर्मीय घाबरणार नाहीत जर वेळ आलीच तर हिंदू पाकिस्तानातील दहशतवाद्यांना जशाच तसे उत्तर देतील नव्हे तर दहशतवाद्यांना घरात घुसून मारु. असा इशारा यावेळी हिंदूत्ववादी संघटनांनी दिला.

मुर्दाबाद मुर्दाबाद पाकिस्तान मुर्दाबाद.., बदला घ्या बदला घ्या. हिंदू वरील हल्ल्याचा बदला घ्या.. अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# सिद्धार्थनगर परिसरातील समस्यांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**● नगर । वीरभूमी–**

सिद्धार्थ नगर परिसरातील नागरी समस्या वाढत असून तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे तसेच नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा देखील विस्कळीत झाला असून घरासमोरील ड्रेनेज लाईन चे पाणी वरतून वाहत असून सर्व परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य झाले व ठीक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले असून या परिसराची स्वच्छता करून पाणीपुरवठा सुरळीत करून सर्व ड्रेनेज लाईन नवीन टाकण्याच्या मागणीसाठी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देताना माजी नगरसेवक अनिल शेकटकर समवेत शिवराष्ट्र सेना पक्षाचे जिल्हाध्यक्ष बाळकृष्ण जगधने, लक्ष्मी धाडगे, शारदा दिनकर, कविता शेलार, यमुना राजगुरू, शोभा केदारे, अलका साबळे, सरिता ठोकळ, पार्वती वैराळ, उषा शेकटकर, गणेश पठारे, गणेश राजगुरू, अनिल वैराळ, संदेश शेकटकर, राहुल शेकटकर आदी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, सिद्धार्थ नगर झोपडपट्टी मधील ड्रेनेज लाईन गेली कित्येक दिवसापासून उघड्यावर वाहत असुन या संदर्भात नागरिकांच्या सह्यानेशी अर्ज केला होता परंतु त्यावर कुठल्याही प्रकारची कारवाई झाली नाही सदरची ड्रेनेज लाईन मनपा कर्मचारी गज घालून लाईन चालू करतात परंतु दोन तासाने पुन्हा ड्रेनेज लाईन उघड्यावर वाहू लागते कारण सदरची ड्रेनेज लाईन संपूर्णपणे गाळाने भरलेली आहे. त्यामुळे तेथे राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. तेथे लहान लहान मुलं त्या घाण पाण्यातून चालतात व तसेच घरामध्ये प्रवेश करतात त्यामुळे लहान मुलांच्या व मोठ्या व्यक्तींच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे व परिसरातील कचरा देखील उचलला जात नाही तसेच पाणीपुरवठा हा गेल्या काही महिन्याभरापासून पूर्णपणे विस्कळीत झालेला आहे. या अगोदर पाण्यासंदर्भात कुठलीही तक्रार अथवा समस्या नव्हती लाल टाकी रोड ते साठे चौक या ठिकाणी मोठ्या प्रमाणात खोदकाम झाल्याने त्या ठिकाणी असलेले वॉल नादुरुस्त खोदकाम करत असताना त्यांना मोठ्या प्रमाणात तडे गेले आहेत तरी संबंधित वॉल मॅन व इंजिनियर यांना वारंवार कल्पना देऊन देखील पाणीपुरवठा सुरळीत अद्याप पर्यंत झालेला नाही तरी परिसरातील पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# राजेंद्र सोनवणे राज्यस्तरीय गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार प्रदान

**● अकोले । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे कार्याध्यक्ष तथा अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीच्या श्री. छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय, मेंहदूरी चे मुख्याध्यापक, राजेंद्र सोनवणे सर यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्य मुख्याध्यापक संघ, मुंबई यांच्या वतीने २०२५ चा राज्यस्तरीय गुणवंत मुख्याध्यापक पुरस्काराने दापोली (ता. रत्नागिरी, जि. रायगड) या ठीकाणी सन्मानित करण्यात आले. यावेळी कोकण विभाग शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, अधिवेशन अध्यक्ष सुनील पंडित, माजी अध्यक्ष सुभाष माने, अरुण थोरात, विद्यमान अध्यक्ष तानाजी माने, सेक्रेटरी नंदकुमार सोनार आदी मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.



राजेंद्र सोनवणे यांनी गेल्या वर्षांपासून अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीच्या विविध माध्यमिकविद्यालयातमुख्याध्यापक पदावर काम केले आहे. त्यांनी आपल्या सेवा कालावधीत विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविले असून सर्व विद्यालयामध्ये भौतिक सुविधा निर्माण केल्या. त्यांचे अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी मुख्याध्यापक संघाचे १५ वर्षे तालुकाध्यक्ष, जिल्हा उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सक्षमपणे पार पाडून मुख्याध्यापक यांना न्याय मिळवून दिला आहे. ते १५ वर्षे मुख्याध्यापक संघाच्या राज्य कार्यकारिणीचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे आज ते मुख्याध्यापक संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष पद सांभाळीत आहे.

माजी गट शिक्षणाधिकारी मारुती लांघी यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या अकोले तालुका शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था अकोलेचे चेअरमन पद सांभाळलेले आहे. तसेच इंफोसिस कंपनीच्या माध्यमातून तालुक्यातीलअनेक जि.प.प्रा.शाळा व माध्यमिक विद्यालयांना संगणक मिळवून दिले तसेच रोटरी क्लब सारख्या विविध सामाजिक संस्थाकडून,दानशूर व्यक्तीकडून कार्यरत असलेल्या विद्यालयांना मदत मिळविली. धामणगाव पाट विद्यालयासाठी इमारतीचे बांधकाम करण्यात त्यांचे मोठे योगदान आहे. या कार्याबद्दल त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# शेवगावात पाकिस्तानच्या ध्वजाला चपलाचा हार घालून पहलगाम हल्ल्याचा निषेध

**● शेवगाव । वीरभूमी–**

जम्मूकाश्मीरच्यापहलगाममध्ये पर्यटकांवर दहशदवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार केला. या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्याच्या निषेधार्थ शेवगाव शहरातील क्रांती चौकामध्ये सकल हिंदू समाजाच्या वतीने पाकिस्तानच्या ध्वजाला चपलाचा हार घालून तीव्र निषेध करण्यात आला. यावेळी आंदोलकांनी पाकिस्तानचा ध्वज जाळल्यानंतर पोलीस व आंदोलकांची झटापट झाली.



यावेळी संघाचे तालुकाध्यक्ष जगदीश धुत म्हणाले की, पहलगाम येथे पोलिसांच्या वेशात आलेल्या अतिरेक्यांनी पर्यटकांना त्यांचा धर्म विचारुन ठार केले. ही निंदनीय बाब आहे. यामध्ये निष्पाप पर्यटकांना जीव गमवावा लागला. देशात हिंदूचे सरकार आल्याने केंद्र सरकारने अतिरेक्यांचा बिमोड करण्यासाठी कडक पाऊले उचलून या नराधमांचा बिमोड करावा, अशी मागणी केली.

यावेळी शिवसेना तालुका प्रमुख आशुतोष डहाळे, डॉ. निरज लांडे यांनी ही आपल्या भावना व्यक्त केल्या. या आंदोलनामध्ये धुत, आशुतोष डहाळे, युवा सेना जिल्हा प्रमुख साईनाथ आधाट, अभी कबाड़ी, शुभम कबाडी, रोहीत काथवटे, डॉ. निरज लांडे, बाळासाहेब फटांगडे, अमर पुरनाळे, मनोज कांबळे, राहुल बंब, अरविंद धुत, योगेश बोडखे, शिवाजी मडके, महेश आहुजा, अक्षय सुपारे, बंडु देहाडराय, बंटी म्हस्के, स्वराज लांडे, निखील खेडकर आदी सहभागी झाले होते.

# काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्याचा जिल्हा न्यायालयात निषेध

## शहर बार असोसिएशनच्या वतीने बळी पडलेल्या निरपराध नागरिकांना श्रद्धांजली

**● नगर । वीरभूमी–**

काश्मीर खोऱ्यातील पहलगामजवळील बायसरन भागात झालेल्या अमानवी दहशतवादी हल्ल्याचा शहर बार असोसिएशनच्या वतीने जिल्हा न्यायालयात निषेध करण्यात आला. या भ्याड हल्ल्यात बळी पडलेल्या २६ निरपराध नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. न्यायालय परिसरात झालेल्या शोकसभेला शहर बार असोसिएशनचे पदाधिकारी व वकील वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शोकसभेत शहर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राजेश कातोरे, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, लायर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे ॲड. रावसाहेब बर्डे, व्हाईस चेअरमन ॲड. विनायक सांगळे, ॲड. अनिता दिघे, खजिनदार ॲड. अनुराधा येवले, ॲड. रघुनाथ शेळके, बी. एन. भालसिंग, ॲड. भगवान कुंभकर्ण, ॲड. अक्षय काळे, ॲड. अतिश निंबाळकर, ॲड. करूणा शिंदे, ॲड. बाळकृष्ण शेडाळे, ॲड. गौरी लोखंडे, ॲड. सुरेश कोहकडे, ॲड. बहिरू जरे, ॲड. आदित्य घालमे, ॲड. बी. जी. खेडकर, ॲड. आनंद सूर्यवंशी, ॲड. सुजाता बोडखे, ॲड. भागा गुंजाळ, ॲड. अजिंक्य काळे, ॲड. रवींद्र रूपसिंग, ॲड. एस. ए. कोतकर, ॲड. रफिक बेग, ॲड. विनायक सांगळे, ॲड. सतीश चौधरी, ॲड. प्रज्ञा उजागरे, ॲड. अभिषेक म्हस्के, ॲड. हर्षद काकडे, ॲड. गौरव दांगट, ॲड. ए. आर. मोकाटे आदींसह वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वांनी मौन पाळून हल्ल्यात बळी गेलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली. शोकसभेत बोलताना ॲड. राजेश कातोरे म्हणाले की, धर्माच्या नावावर निष्पाप नागरिकांचे प्राण घेणे ही अधार्मिक वृत्ती असून अशा अमानुष कृत्यांचा तीव्र निषेध व्हायला हवा. या हल्ल्याच्या सूत्रधारांना शोधून जशास तसे उत्तर दिले गेले पाहिजे. धर्मांधतेच्या नावावर अशा घटना घडवणाऱ्यांना मुळापासून उखडून टाकणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

ॲड. सुरेश लगड म्हणाले की, पाकिस्तानसारखे शत्रूराष्ट्र दहशतवादी संघटनांना पाठीशी घालून भारताच्या अखंडतेला सुरुंग लावत आहे. हा भ्याड हल्ला म्हणजे मानवतेवर झालेला घात आहे. ॲड. अनिता दिघे म्हणाल्या की, फक्त श्रद्धांजली वाहून उपयोग नाही, आता वेळ आली आहे थेट उत्तर देण्याची. भारताचे नागरिक अशा भ्याड हल्ल्यांना घाबरत नाहीत. धर्म विचारून मारणाऱ्यांना आता तितक्याच कठोरतेने उत्तर देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

गुरुवारी (दि.२४ एप्रिल) महाराष्ट्रातील सर्वच न्यायालयात काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्याचा निषेध नोंदवून, बळी गेलेल्या नागरिकांना श्रध्दांजली वाहण्यात आली आहे. यावेळी सर्व वकिलांनी एकमताने केंद्र सरकारकडे दहशतवादी संघटनांविरोधात कठोर भूमिका घेण्याची मागणी केली. देशाच्या अखंडतेवर आणि शांततेवर घाला घालणाऱ्या शक्तींना माफ करता कामा नये, असा सूर यावेळी उमटला.

# दहशतवादी हल्ल्यात बळी गेलेल्यांना कौटुंबिक न्यायालयात श्रद्धांजली



**● नगर । वीरभूमी–**

काश्मीर खोऱ्यातील पहलगामजवळील बायसरन भागात झालेल्या अमानवी दहशतवादी हल्ल्याचा कौटुंबिक न्यायालय व कौटुंबिक न्यायालय वकील संघाच्या वतीने निषेध करण्यात आला. या भ्याड हल्ल्यात बळी पडलेल्या निरपराध नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

कौटुंबिक न्यायालयात झालेल्या श्रध्दांजलीकार्यक्रमाप्रसंगीकौटुंबिक न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती संगीता ना. भालेराव, कौटुंबिक न्यायालय वकील संघाचे अध्यक्ष ॲड. लक्ष्मण कचरे, उपाध्यक्ष तथा विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, सचिव ॲड. राजेश कावरे, ॲड. शिवाजी कराळे, प्रबंधक एस. के. मोहोळकर, सहाय्यक अधीक्षक ए. आय. शेख, कर्मचारी एस. के. चव्हाण, ए. पी. झिंजे, आर. एस. गुंडू, ए. एस. तगारे, आर. ए. मोरे, एस. बी. आळकुटे, एल. एस. जाधव, एस. के. जाधव आदी उपस्थित होते. यावेळी मौन पाळून हल्ल्यात बळी गेलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. उपस्थितांनी या भ्याड हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध नोंदवून दहशतवादी संघटनांना चोख उत्तर देण्याची मागणी केली.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com